Test Booklet No.
परीक्षा पुस्तिका संख्या

This Booklet contains **16** printed pages.
इस पुस्तिका में **16** मुद्रित पृष्ठ हैं ।

# MAK-23-I

**PAPER I / प्रश्न-पत्र I**
**PART IV & V / भाग IV & V**
**Marathi Language Supplement**
**मराठी भाषा परिशिष्ट**

Test Booklet Code
परीक्षा पुस्तिका कोड

**C**

**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 15 & 16) of this Test Booklet.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 15 व 16) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**

**For instructions in MARATHI see Page 2 of this booklet. / मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें ।**

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Lauguage II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue/Black Ball Point Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **C**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V consisting of **60** Objective Type Questions, and each carries 1 mark :
   Part IV : Language I – (MARATHI) *(Q. Nos. 91 – 120)*
   Part V : Language II – (MARATHI) *(Q. Nos. 121 – 150)*
7. Part IV contains 30 questions for Language I and Part V contains 30 questions for Language II. In this Test Booklet, only questions pertaining to MARATHI language have been given. **In case the language(s) you have opted for as Language I and/or Language II is a language other than MARATHI, please ask for a Supplement (Language) Test Booklet of C Code that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form. No change in languages is allowed.**
8. **Candidates are required to attempt questions in Language II (Part V) in a language other than the one chosen as Language I (Part IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

## *परीक्षार्थियों के लिए निर्देश*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **कोड C** है । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का कोड, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य प्रश्न पुस्तिका पर छपे कोड से मिलता है । अगर यह भिन्न हो तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, तथा प्रत्येक 1 अंक का है :
   भाग IV : भाषा I – (मराठी) *(प्रश्न सं. 91 – 120)*
   भाग V : भाषा II – (मराठी) *(प्रश्न सं. 121 – 150)*
7. भाग IV में भाषा I के लिए 30 प्रश्न और भाग V में भाषा II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा I और/या भाषा II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया C कोड वाली उस भाषा वाली परिशिष्ट (भाषा) परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए । भाषाओं का परिवर्तन अनुमन्य नहीं है ।**
8. **परीक्षार्थी भाषा II (भाग V) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

Name of the Candidate (in Capital Letters) : ______________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) :

Roll Number (अनुक्रमांक) : in figures (अंकों में) ______________________
: in words (शब्दों में) ______________________

Centre of Examination (in Capital Letters) : ______________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) :

Candidate's Signature : ______________ Invigilator's Signature : ______________
परीक्षार्थी के हस्ताक्षर : निरीक्षक के हस्ताक्षर :

Facsimile signature stamp of Centre Superintendent ______________________

ह्या पुस्तिकेत 16 मुद्रित पृष्ठ आहे.

# MAK-23-I

चाचणी पुस्तिका कोड

**C**

**प्रश्नपत्रिका I**

**भाग IV आणि V**

**मराठी भाषा पुरवणी**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मागीलपृष्ठावरील (15 आणि 16) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींसाठी आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग चौथा (भाषा पहिली) **किंवा** भाग पाचवा (भाषा दुसरी) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग पहिला, भाग दुसरा आणि भाग तिसरा सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग चौथा आणि पाचवा सोडवायचा आहे.
3. भाग चौथा आणि पाचवा यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पानावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **फक्त निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड C** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत चौथा आणि पाचवा असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :
   **भाग चौथा : भाषा पहिली – (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*
   **भाग पाचवा : भाषा दुसरी – (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग चौथा मध्ये भाषा पहिली साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग पाचवा मध्ये भाषा दुसरी साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत फक्त मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा पहिली व/वा भाषा दूसरी साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या C कोड ची भाषेवरील प्रश्न असलेल्या पुरवणीचा चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत. भाषांमध्ये बदल करण्याची परवानगी नाही.**
8. **भाषा दुसरी (भाग पाचवा) साठी असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा पहिली (चौथ्या भागातील) पेक्षा वेगळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये ____________________

: शब्दांमध्ये ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________

पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

परीक्षार्थींनी जर **भाषा पहिली** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग IV
# भाषा I
# मराठी

***सूचना :*** *पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.*

आज प्रत्येक शहरात हिरवाई गडप झालीय. तिची जागा आता काँक्रीटच्या जंगलानं घेतलीय. शिवाय, हवेचं प्रदूषण ही भरमसाट वाढलंय. भारतातल्या जवळपास कुठल्याही महत्त्वाच्या शहरात विमानातून प्रवेश करताना आज भस्सदिशी नजरेत शिरतो तो हिरवाईचा पुरता अभाव. मला वाटतं प्रत्येक शहरात मोठ्या प्रमाणात झाडं लावणं हाच तिथल्या हवेचं प्रदूषण कमी करण्याचा अत्युत्तम उपाय आहे.

वृक्षांच्या उपकारकतेबद्दलची पुष्कळच अभ्यासपूर्ण आणि तपशीलवार माहिती जगभर सर्वत्र प्रकाशित झाली आहे. त्यातून दिसून येतं की, अत्यंत अपायकारक असलेले २.५ ते १० मायक्रॉन (मायक्रोमीटर) आकाराचे द्रव्यकण हवेतून शोषून घेण्यात झाडं अत्यंत उपयुक्त ठरतात. प्रामुख्यानं स्वयंचलित वाहनांच्या धुरातून आणि जैविक पदार्थांच्या ज्वलनातून हे द्रव्यकण हवेत पसरत असतात. यातील २.५ मायक्रॉन आकाराचे द्रव्यकण श्वासावाटे आपल्या शरीरात शिरले तर ते थेट मेंदूपर्यंत जाऊ शकतात. त्यापासून अनेकविध आजार उद्‌भवू शकतात. याहून थोडे मोठे म्हणजे २.५ ते १० मायक्रॉन इतक्या आकाराचे द्रव्यकण दमा आणि फुफ्फुसांच्या इतर आजारांना कारणीभूत ठरू शकतात. असे हे उपद्रवी द्रव्यकण, झाडं अत्यंत परिणामकारकरीत्या पकडतात. झाडांच्या पानांचा पृष्ठभाग काहीसा मेणकट असतो. शिवाय, ती आडवीतिडवी स्वैर पसरलेली असतात. त्यामुळे विविध बाजूंनी येणारे हे सर्व द्रव्यकण त्यांच्यावर सहज चिकटू शकतात. आणखी एक गोष्ट अशी की, पानं धनविद्युतभारित असतात, त्यामुळे २.५ ते १० मायक्रॉन आकाराचे ऋणविद्युतभारित द्रव्यकण त्यांच्याकडे आपोआप आकृष्ट होतात. या तिन्ही कारणांच्या समुच्चयामुळे झाडं कुशल द्रव्यकणनिवारक बनतात.

एका अभ्यासाअंती या प्रतिपादनाला पुष्टी मिळाली आहे की, नागरी वसाहतीत अधिक झाडं असणं आणि तिथल्या रहिवाशांना दम्याचा ॲटॅक येण्याचं प्रमाण कमी असणं यांचा सकारात्मक परस्परसंबंध आहे. जिथं झाडं अधिक तिथं दम्याचा असा ॲटॅक येण्याचं प्रमाण कमी आढळतं. संशोधकांनी असाही निष्कर्ष काढला आहे की, शहराच्या एकूण क्षेत्रफळाच्या २० ते ३० टक्के इतका भाग झाडांनी व्यापलेला असेल तर द्रव्यकणांचं हे प्रदूषण जवळजवळ २४ टक्क्यांनी कमी होतं. बहुतेक भारतीय शहरांत वृक्षव्याप्त क्षेत्रफळ फक्त ७ ते १५ टक्के इतकं कमी आहे. हे वाढवण्याची नितांत गरज आहे. झाडं फक्त हवेचं प्रदूषणच कमी करत नाहीत, तर ती आपल्या पृथ्वीला उष्णतारोधक ढालही पुरवतात. झाडं शहरांतील आणि उपनगरांतील काँक्रीटचं आणि डांबराचं उष्णतामान चार ते पाच अंश सेल्सिअसनं कमी ठेवतात आणि सूर्याच्या प्रखर अल्ट्राव्हायोलेट किरणांपासूनही आपल्या त्वचेचं रक्षण करतात.

सर्वच प्रकारच्या झाडांची पानं अशी प्रदूषक द्रव्यं हवेतून बाजूला करण्याचं काम करत असतात; परंतु पाईन किंवा इतर सूचिपर्णी वृक्ष हे काम विशेष परिणामकारकरीत्या करतात. हे वृक्ष सदाहरितही असतात. हिवाळ्यातही त्यांची पानं झडत नाहीत. त्यामुळे द्रव्यकण आणि धूळ शोषून घेण्याच्या बाबतीत ते सर्वाधिक कार्यक्षम असल्याचं दिसून आलं आहे. आणि म्हणून, शहरातील वृक्षारोपणासाठी विविध स्वरूपाच्या झाडांची निवड करत असताना या सदाहरित वृक्षांचंही योग्य असं प्रमाण आपण त्यात आवर्जून राखायला हवं.

**91.** लेखकाच्या मते झाडं ज्या कृती करतात, त्यापैकी चुकीचे विधान शोधा.

(1) द्रव्यकण आणि धूळ शोषण

(2) दम्याच्या त्रासात वाढ

(3) प्राणवायू पुरवठा

(4) त्वचेचं रक्षण

**92.** प्रदूषकद्रव्ये वातावरणातून अधिक चोखपणे बाजूला सारण्याचे काम कोण करते ?

(1) पाईन व सूचिपर्ण

(2) जैविक पदार्थ

(3) स्वयंचलित वाहने

(4) काँक्रीटचे उष्णतामान

**93.** ‘भरमसाट’ शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.
(1) भडिमार
(2) आसमंत
(3) भव्य
(4) अमर्याद

**94.** ‘ती <u>आडवीतिडवी</u> स्वैर पसरलेली असतात’ या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
(1) भाववाचक सर्वनाम
(2) सर्वनाम
(3) क्रियाविशेषण अव्यय
(4) क्रियापद

**95.** पुढीलपैकी विशेषनाम नसलेला पर्याय शोधा.
(1) सूचिपर्णी
(2) झाड
(3) पृथ्वी
(4) पाईन

**96.** उताऱ्या प्रमाणे कोणत्या दोन बाबींमध्ये सकारात्मक संबंध असल्याचे निष्पन्न झाले असे सांगण्यात आले आहे ?
(1) दमा आणि फुफ्फुसांचा आजार
(2) अधिक झाडं आणि कमी होणारा दम्याचा त्रास
(3) प्रदूषक द्रव्ये आणि डांबराचे उष्णतामान
(4) काँक्रीटचे जंगल आणि वायुप्रदूषण

**97.** एखादी गोष्ट ‘मुद्दाम’, ‘निक्षून’ करणे या आशयाचा कोणता शब्द उताऱ्यात आला आहे ?
(1) आवर्जून
(2) अपायकारक
(3) उपयुक्त
(4) कार्यक्षम

**98.** लेखकाच्या मते कोणत्याही शहरात प्रवेश करताना प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट कोणती ?
(1) वृक्षारोपण
(2) काँक्रीटचे जंगल
(3) प्रदूषक द्रव्ये
(4) हिरवाईचा अभाव

**99.** लेखकाच्या मते जागतिक पातळीवर कोणती माहिती उपलब्ध झाली आहे ?
(1) वृक्षांच्या उपकारकतेबद्दलची सखोल व अभ्यासपूर्ण माहिती.
(2) झाडं प्रदूषण कमी करत नाही, उलट पृथ्वीचे तापमान वाढवतात.
(3) झाडांची पाने धनविद्युतभारित नसतात.
(4) बहुतेक भारतीय शहरात वृक्षव्याप्त क्षेत्रफळात ७ ते १५ टक्के वाढ.

***सूचना :** पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.*

दृष्ट हिला लागली, पडे कुणि पाप्याची सावली !

लिम्बलोण ग कोणी उतरा,
जगदम्बेचा ग अंगारा
लावा, बान्धा गन्डादोरा.
काळजी घ्या चांगली

चाफ्यापरि गोरेपण पिवळं,
काकडीपरी अंग कोवळं,
मैद्यापरि लुसलुशीत सगळं,
— दृष्ट पडुनि करपली !

ज्यांच्या पोटीं उदण्ड माया
लेकुरवाळ्या आयावाया,
पोक्त शहाण्या आणा दाया,
दावा चाफेकळी.

चिमणिसारखं तोंड जाहलं,
डोळ्यावरचं तेज चाललं,
नाक उंच वर येउं लागलं,
गत कशी ग जाहली !

**100.** ‘लुसलुशीत’ हे कोणते विशेषण आहे ?
(1) गुणविशेषण
(2) क्रमवाचक विशेषण
(3) अनिश्चित संख्याविशेषण
(4) गणवाचक विशेषण

**101.** ‘चाफेकळी’ ची उपमा कोणाला दिली आहे ?
(1) लेकुरवाळयांना
(2) पोक्त बायांना
(3) दायांना
(4) नायिकेला

**102.** ‘काकडीपरी अंग कोवळं’ यातील ‘परी’ हे कोणते अव्यय आहे ?
(1) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय
(2) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय
(3) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय
(4) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय

**103.** ‘दाया’ या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.
(1) उपचारिका
(2) सुतिका
(3) सेविका
(4) परिचारिका

**104.** चिमणीसारखे तोंड होणे म्हणजे....
(1) अपराधी वाटणे
(2) दु:खी होणे
(3) सुरकुत्या पडणे
(4) चेहरा सुकणे

**105.** तरुणीवर उपाय करण्यासाठी बोलावण्याचे कारण काय ?
(1) त्या प्रेमळ असतात
(2) त्या अनुभवी असतात
(3) त्या लिंबलोण उतरवतात
(4) त्या शहाण्या असतात

***सूचना :*** *अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची (प्रश्न क्र. 106 ते 120) उत्तरे द्या.*

**106.** तिसऱ्या इयत्तेची शिक्षिका वर्गात मुलांना नवीन शब्द सांगते. पुढीलपैकी कोणत्या कृतीतून मुलांना नवीन शब्द चांगल्या प्रकारे सांगता येतील ?
(1) शिक्षिकेने मुलांना त्या शब्दाची नेमकी परिभाषा सांगणे.
(2) तो शब्द व्यावहारिक पातळीवर वापरात येतो त्या संदर्भात त्याचा अर्थ सांगणे.
(3) शिक्षिकेने तो शब्द फळ्यावर लिहून विद्यार्थ्यांना पाठ करावयास सांगणे.
(4) शिक्षिकेने त्या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सांगून त्यांच्या भाषेत त्याचा अर्थ सांगणे.

**107.** भाषा शिकणे हे एका अर्थाने....
(1) प्रक्रिया आहे
(2) उत्पादन आहे
(3) कौशल्य आहे
(4) आत्मसात करणे आहे

**108.** पुढील उदाहरणासाठी अनुकूल पर्याय निवडा.
*'मी भाषेवर लक्ष केंद्रित करताना याची दखल घेतो की ते योग्य आहे.'*
(1) उजळणी
(2) स्व-निरीक्षण
(3) ट्रॉंसलेंग्युजिंग
(4) पाठ करणे

**109.** इयत्ता दुसरीचे विद्यार्थी "हेड एंड शोल्डर्स, नीस एंड टोस" हे गाणं म्हणतात. गाणं म्हणत असताना ते शरीराच्या त्या त्या अवयवांना स्पर्श करतात. शिक्षिका त्यांना कोणत्या पद्धतीने शिकवीत आहे ?
(1) संवादात्मक भाषा शिक्षण
(2) समग्र शारीरिक प्रतिभाव
(3) निवड (Electic)
(4) दृष्यश्राव्य

**110.** 'वाचनाचे प्रकार' आणि 'वाचकांची कृती' यांची योग्य संगती शोधा.

| | *वाचनाचे प्रकार :* | | *वाचकांची कृती :* |
|---|---|---|---|
| A. | अनुमान करणे | i. | लेखक ज्या प्रकारे लिहितो त्या आधारे लेखकाची वैचारिकता समजणे. |
| B. | दृष्टिकोनाचा अनुमान लावणे | ii. | मजकुरातील काही भागाचा अनोळखी शब्दांची ओळख करुन घेण्यास वापर. |
| C. | संदर्भासह अर्थ लावणे | iii. | शीर्षक आणि परिचयात्मक परिच्छेदाच्या आधारे माहिती कशी देण्यात आली आहे ते पाहणे. |
| D. | गहन वाचन | iv. | मजकुरात भाषा कशी वापरली आहे यावर भर देणे. |
| E. | मजकुराची रचना समजून घेणे | v. | मजकूर कशाशी संबंधित आहे हे स्वत:ला कळावे यासाठी शीर्षक आणि चित्रांचा आधार घेणे. |

(1) A-i, B-iv, C-v, D-ii, E-iii
(2) A-ii, B-i, C-iii, D-iv, E-v
(3) A-iv, B-iii, C-ii, D-i, E-v
(4) A-v, B-i, C-ii, D-iv, E-iii

**111.** विद्यार्थी समूहाला मागील पाठावर बेतलेल्या शब्द संग्रहावरील पाच प्रश्नांची उत्तरे देणे आहे. त्या नंतर ते दुसऱ्या समूहाला आपले प्रश्न देऊन त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. असे करणे कशाचे उदाहरण आहे ?
(1) प्रत्याभरण
(2) वाचन मूल्यमापन
(3) सवंगड्याकडून झालेले मूल्यमापन
(4) स्व-मूल्यमापन

**112.** माझी शिक्षिका एका कार्डावर एखादा शब्द किंवा वाक्य मला लिहून देते आणि मी वर्गासमोर अभिनय करून दाखवतो. विद्यार्थ्यांनी तो शब्द किंवा वाक्य ओळखायचे असते. विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आणि त्यांचा अग्रक्रम यासाठी योग्य पर्याय निवडा.

(1) मला ऐकल्यावर भाषा लक्षात येते.
(2) कार्डावर लिहिलेला मजकूर पाठ केल्यावर भाषा लक्षात येते.
(3) गतिबोधनात्मक पातळीवर (kinesthetically) गुंतल्यावर भाषा लक्षात येते.
(4) मला दृष्यरुपात पाहिल्यावर भाषा लक्षात येते.

**113.** *विधान (A) :*
शाळेत येणारे प्रत्येक मूल त्यांच्या वयानुरूप चांगल्या प्रकारे भाषा वापर करतात.
*कारण (R) :*
भाषिक व सांस्कृतिक वैविध्यामुळे त्यांना त्यांच्या क्षमतांचे सादरीकरण करता येत नाही.
पुढीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण ***नाही***.
(2) (A) बरोबर आहे, पण (R) चूक आहे.
(3) (A) चूक आहे, पण (R) बरोबर आहे.
(4) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

**114.** पाचव्या इयत्तेतील मनजीत शिक्षकांशी, मित्रांशी आणि एका दोन वर्षाच्या मुलासोबत वेगवेगळ्या प्रकारे बोलतो. सामाजिक पर्यावरणात भाषा कशी वापरावी, हे मनजीतला नीट कळते. भाषेच्या संदर्भात असे मानणे म्हणजे....

(1) अर्थविन्यास
(2) व्यवहारकुशलता
(3) भाषिक वर्तन
(4) नैसर्गिकता

**115.** एका आईच्या लक्षात येते की मुलगा काहीवेळा अशा गोष्टी बोलतो ज्या तिने कधीही त्याच्या भावडांकडून किंवा मोठ्या माणसांकडून ऐकल्या नाहीत. ती बुचकळयात पडते. तिला असे वाटते की मुलाने कुटुंबातील आणि आजूबाजूच्या लोकांच्या अनुकरणातून भाषा आत्मसात केली आहे. तिला असे वाटणे म्हणजे....

(1) वागणूक
(2) पदबंध रचना
(3) बहुभाषकता
(4) देशीयता

**116.** औपचारिक सूचनांचे वाचन करण्यापूर्वीचे कौशल्य ज्यांच्यामुळे नंतरच्या टप्प्यावर इतर शैक्षणिक कुशलता आत्मसात करता येतात. ते म्हणजे....

(1) उदीयमान अभ्यासक्रम
(2) उदीयमान गुणधर्म
(3) उदीयमान साक्षरता
(4) उदीयमान उपाययोजना

**117.** एका आजींना पुस्तकातील गोष्टी आपल्या नातवंडांना वाचून दाखवणे आवडते. यातून मुलांना नवीन कल्पना सुचतात आणि पुस्तकाविषयी माहिती मिळते. नातवंडांनाही हा उपक्रम आवडतो. हा उपक्रम म्हणजे....

(1) सह वाचन
(2) संवादात्मक वाचन
(3) मोठ्याने वाचन
(4) आदर्श वाचन

**118.** पुढीलपैकी कोणत्या पद्धतीत भाषेतील मूलभूत घटक म्हणजे अक्षर, स्वन शिकविले जाते. पुढे गेल्यावर स्वनांच्या मदतीने शब्द कसे तयार होतात हे ही शिकवले जाते. ही पद्धत म्हणजे....

(1) उर्ध्वगामी पद्धती
(2) समग्र भाषा पद्धती
(3) संरचनात्मक पद्धती
(4) अधोगामी पद्धती

**119.** *विधान (A) :*
फोनेटिक शब्द रचनेचा वापर केल्यामुळे अचूक स्पेलिंग लिहिण्याचा वेग मंदावतो.
*कारण (R) :*
लहान वयात मुले पारंपारिक स्पेलिंगच्या ऐवजी आपल्या परीने स्पेलिंग वापरतात तेव्हा अचूक स्पेलिंग लिहिण्याच्या त्यांच्या क्षमतेचा वेग मंदावत नाही.
याचे अचूक कारण शोधा.

(1) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण ***नाही***.
(2) (A) बरोबर आहे, पण (R) चूक आहे.
(3) (A) चूक आहे, पण (R) बरोबर आहे.
(4) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

**120.** एखादी नवीन भाषा शिकताना त्या भाषेचे वैशिष्ट्यपूर्ण उच्चारण नियमांमुळे मुलांचा आत्मविश्वास कमी पडतो. या अडचणीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणजे....

(1) वर्गात अधिकाधिक संभाषण घडेल अशाप्रकारचे उपक्रम राबवणे.
(2) समुपदेशकाच्या मदतीने उच्चारण उपचार करणे आणि सराव करणे.
(3) तिथल्या तिथेच चुका दुरुस्त करणे.
(4) मुलांनी वर्गात मोठ्याने वाचणे.

परीक्षार्थींनी जर **भाषा दुसरी** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग V
# भाषा II
# मराठी

***सूचना :*** *पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.*

झाडं आपल्या सर्वांच्याच जीवनाचं अमर्याद काळापासून पालनपोषण करत आली आहेत. अगदी शब्दशः भूमी आणि आकाश यांमधील दुवा आहेत झाडं. आपल्या मुळांद्वारे ती जमिनीतील पाणी आणि क्षार शोषतात, आपल्या पानांद्वारा वातावरणातील कार्बन डायॉक्साईड घेतात आणि सौरशक्तीच्या साह्यानं त्या साऱ्याचं रूपांतर सर्वांच्याच जीवनाचे प्रमुख घटक असलेल्या प्राणवायूत आणि अन्नामध्ये करतात. झाडं नसती तर या आपल्या पृथ्वीगोलावर मुळी जीवनच नसतं.

पावसाच्या निर्मितीतही झाडांचा वाटा असतो. त्यांच्या पानांतून होणाऱ्या पाण्याच्या वाष्पीभवनामुळे सूक्ष्म पर्यावरणीय बदल घडून येतात आणि पर्जन्य वर्षावाला ते बदल साह्यभूत ठरतात. पावसाचं प्रमाण वाढलं की हवेचं प्रदूषणही कमी होतं. हवा आणि पर्यावरण स्वच्छ ठेवायलाही झाडं मदत करतात. त्यांच्यामुळे धूळ कमी होते, आवाजाचं प्रदूषण मर्यादित होतं. कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डायॉक्साईड, नायट्रोजन डायॉक्साईड वगैरेंसारखे प्रदूषक घटक झाडं शोषून घेतात. जमिनीची धूपही झाडंच थांबवतात.

झाडं जीवनाला उपकारक रसायनांच्या लहरीच्या लहरी वातावरणात सोडतात. हे मोठ्या प्रमाणात होत असता यापैकी काही रसायनांचे फवारे वातावरणाचं योग्य नियमन करण्याला साह्य करतात. इतर काही जिवाणूरोधक, काही बुरशीरोधक, तर काही विषाणूरोधकही असतात.

झाडं ही जलशुद्धी करणारी नैसर्गिक गाळणी आहेत. पाण्यातील स्फोटक पदार्थ, विद्रावके आणि सेंद्रिय कचऱ्यासह, अत्यंत विषारी पदार्थसुद्धा विलग करून पाणी स्वच्छ करण्याची क्षमता झाडांमध्ये असते. झाडांची मुळं हे काम करतात. त्यासाठी, या मुळांभोवती प्रचंड प्रमाणात वसती करून असलेल्या सूक्ष्म जंतूंच्या दाट वसाहतीचा झाडांना वापर होतो. हे जंतू दूषित पाण्यातील पोषक द्रव्यं शोषून घेत असताना उर्वरित पाणी शुद्ध करून टाकतात.

प्राकृतिकरीत्या वातावरण स्वच्छ करण्याचं काम तर झाडं करतातच; पण आध्यात्मिक संवेदनाग्र म्हणूनही त्यांचा वापर होत असल्याचं दिसतं. गौतम बुद्ध, रामकृष्ण परमहंस आणि इतरही अनेक संतांना झाडाखाली बसूनच साक्षात्कार झाला. झाडाखाली बसला असताना वरून सफरचंद पडलं तेव्हाच वैश्विक गुरुत्वाकर्षणाची कल्पना न्यूटनला सुचली हे तर आपण वाचत आलो आहोतच. अनेक महान विचारवंतांना वनात भ्रमंती करत असतानाच मौलिक कल्पना स्फुरल्याची किती तरी उदाहरणं इतिहासाच्या पानापानावर आढळतात.

जपानमधील संशोधकांनी 'वनस्नान' असं नाव दिलेल्या कल्पनेचा दीर्घकाळ अभ्यास केला आहे. तणाव निर्माण करणाऱ्या रसायनांची शरीरातील पातळी छोट्या वनात मारलेल्या फेरफटक्यामुळे कमी होते आणि आपल्या रोगप्रतिकारक प्रणालीतील, ट्यूमरना आणि विषाणूंना तोंड देणाऱ्या लढवय्या नैसर्गिक पेशींची संख्या वाढते. शहरातील समस्याग्रस्त कनिष्ठ वस्त्यांच्या अभ्यासातून असं दिसून आलं आहे की, टेकड्यांनी आणि वृक्षराजीनं भरलेल्या परिसरातील लोकांत नैराश्य या विकाराचं प्रमाण कमी असतं.

**121.** झाडांतून बाहेर पडणाऱ्या उपकारक रासायनिक लहरींच्या वैशिष्ट्यांपैकी चुकीचा पर्याय शोधा.

(1) बुरशीरोधक

(2) पर्जन्यरोधक

(3) विषाणूरोधक

(4) जीवाणूरोधक

**122.** जपानी संशोधकांनी पुढीलपैकी कोणत्या घटकाचा दीर्घकाळ अभ्यास केल्याचे लेखकाने नमूद केले आहे ?

(1) नैसर्गिक पेशी

(2) वृक्षराजी

(3) जमिनीची धूप

(4) वनस्नान

**123.** 'झाडे जमिनीतील पाणी आणि क्षार शोषतात' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

(1) विशेषनाम

(2) क्रियापद

(3) अव्यय

(4) सर्वनाम

**124.** झाडांकडून होणाऱ्या कृतींपैकी न होणारी कृती कोणती ?

(1) जमिनीतील पाणी आणि क्षार शोषणे

(2) जलशुद्धि करणे

(3) पर्जन्यवृष्टीला सहाय्यता करणे

(4) जमिनीची धूप वेगवान करणे

**125.** वरील उताऱ्यात 'दुवा' हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला गेला आहे ?

(1) अभिवादन

(2) परस्परांना जोडणारा घटक

(3) प्रतिस्पर्धी

(4) प्रार्थना

**126.** पुढील पर्यायांपैकी अकर्मक क्रियापदाचा पर्याय शोधा.

(1) संशोधकांनी दीर्घकाळ अभ्यास केला आहे

(2) झाड पडले

(3) झाडे पाणी शुद्ध करतात

(4) स्वच्छ करण्याचे काम झाडं करतात

**127.** झाडांना कोणत्या घटकाचा उपयोग होतो ?

(1) नैसर्गिक पेशी

(2) जमिनीची धूप

(3) सेंद्रीय कचरा

(4) सूक्ष्मजंतू

**128.** पुढीलपैकी कोणत्या घटकाद्वारे वातावरणाचे नियमन होते ?

(1) झाडांची मुळं

(2) कार्बन डायॉक्साईड

(3) सल्फर डायॉक्साईड

(4) रासायनिक फवारे

***सूचना :*** *पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.*

मानवी जीवन व नदी याचा फार जवळचा संबंध आहे, किंबहुना दोन्ही परस्पर पूरकच आहेत. जगातील अनेक मोठी शहरे नदीकाठीच वसलेली आहेत. यात प्रामुख्याने वॉशिंग्टन, टोकियो, बँकॉक, लंडन, कैरो ही सांगता येतील. भारतातही अनेक मोठी शहरे ही नदीकाठी वसलेली आपल्याच पाहायला मिळतात. यामध्ये प्रामुख्याने महानदी (कटक), साबरमती (अहमदाबाद), गोदावरी (नाशिक), सतलुज (फिरोजपुर), कावेरी (लुधियाना, तिरूचिरापल्ली, श्रीरंगपट्टणम्), कृष्णा (विजयवाडा), गोमती (लखनौ), मुशी (हैदराबाद), गंगा (हरिद्वार, वाराणसी, पाटणा, कानपूर), शरयू (अयोध्या), तापी (सुरत), नर्मदा (जबलपुर), हुगळी (कोलकाता), चंबल (कोटा), झेलम (श्रीनगर), यमुना (दिल्ली, आग्रा) ही प्रमुख शहरे आहेत. यावरूनच लक्षात येते की मानवी जीवनामध्ये नद्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या संस्कृतीमध्ये नदीला देवीचे रूपच दिल्याचे दिसून येत आहे, याचे कारण देखील प्रामुख्याने हेच आहे.

मानवी जीवनात जन्मापासून मृत्यूपर्यंत होणारे सर्व संस्कार जलाशी विशेषत: नदीशी निगडित आहेत. जीवनाच्या बंधनातून केवळ परमेश्वर किंवा नदीच मोक्ष देवू शकते, अशी खास करून भारतीयांची धारणा असल्याने आपण जीवनदायी असलेल्या नदीलाही मातृत्व प्रदान केले आहे. कृतज्ञतेच्या कल्पनेतून नद्यांना मातेचा सन्मान देण्यात आला आहे. नदीला देवता मानण्यात येत असल्याने तिला सामान्यत: स्त्रीत्वाचे प्रतीक मानले जाते. कारण संस्कृती जन्माला घालण्याची क्षमता या नदी आणि माता या दोघींमध्ये असते. नदीला लोकमाता म्हणून देखील गौरविले जाते.

नाशिक जिल्ह्याला समृद्ध परंपरा लाभलेली आहे. पौराणिक काळापासून ते अलीकडच्या काळापर्यंत नाशिक जिल्ह्याची सर्व क्षेत्रातील वाटचाल उल्लेखनीय राहिलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने विचार करायचा झाला तर नाशिकची समृद्ध जलसंपदा ही महत्त्वाची बाब होय. नाशिक जिल्ह्यामधून उगम पावणाऱ्या नद्यांचे महत्त्व म्हणजे अर्ध्या महाराष्ट्रहून अधिक क्षेत्राची तहान भागवण्यात जिल्ह्याचा सहभाग आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. देशातल्या प्रमुख नद्यांपैकी एक असलेली गोदावरी नदी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग व्यापते. गिरणा नदी उत्तर महाराष्ट्र तर वैतरणा नदी कोकण विभागातील मुंबई असा महाराष्ट्रातील जवळपास ६० टक्के भागास पाणीपुरवठा या नद्यांद्वारे होतो. त्यामुळे नाशिकमधून जाणाऱ्या पाण्यावर बराचसा महाराष्ट्र अवलंबून आहे. गोदावरीशिवाय कश्यपी आणि दारणा या नद्यांची उगम स्थाने देखील नाशिक जिल्ह्यात आहेत.

**129.** भारतात लोकमाता म्हणून नदीचा गौरव करण्याच्या धारणेमागे कोणती भावना आहे ?

(1) कृतज्ञता
(2) मोक्ष
(3) संस्कृती
(4) कृतघ्नता

**130.** शहर आणि नदी शब्दजोड्यांपैकी चुकीची शब्दजोडी शोधा.

(1) लखनौ – गोमती
(2) पटना – शरयू
(3) अहमदाबाद – साबरमती
(4) कोटा – चंबल

**131.** 'दोन घटक परस्पर पुरक असणे' म्हणजे काय ?

(1) एकमेकांच्या दृष्टिक्षेपात नसणे
(2) एकमेकांशिवाय जगता येणे
(3) एकमेकांशिवाय अस्तित्त्वच नसणे
(4) एकमेकांच्या विरोधात असणे

**132.** पुढीलपैकी भाववाचक नाम कोणते ?

(1) कश्यपी
(2) कावेरी
(3) शरयू
(4) मातृत्व

**133.** गोदावरीव्यतिरिक्त कोणत्या नदीचा उगम महाराष्ट्रातून होतो ?

(1) सतलुज
(2) साबरमती
(3) दारणा
(4) महानदी

**134.** पुढील विधानांपैकी चुकीचे विधान शोधा.

(1) नाशिक जिल्ह्याला समृद्ध परंपरा लाभली आहे.
(2) गोदावरी नदी उत्तर महाराष्ट्राचा भाग व्यापते.
(3) महाराष्ट्राला ६० टक्के पाणी नद्यांतून मिळते.
(4) जगातील अनेक मोठी शहरे नदीकाठीच वसलेली आहेत.

**135.** 'जगातील <u>मोठी</u> शहरे नदीकाठी वसलेली आहेत' या वाक्यातील अधोरेखित शब्द ____________ आहे.

(1) विशेषनाम
(2) विशेषण
(3) समास
(4) सकर्मक क्रियापद

***सूचना :*** *अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची (प्रश्न क्र. 136 ते 150) उत्तरे द्या.*

**136.** शब्दाचा ससंदर्भ अर्थ समजावून शिकवलेले वाचन म्हणजे....

(1) उर्ध्वगामी पद्धती

(2) समग्र भाषा पद्धती

(3) संरचनात्मक पद्धती

(4) संज्ञापनात्मक पद्धती

**137.** भाषेबद्धल विचारकरणे आणि बोलणे म्हणजे....

(1) निपुण संभाषक

(2) उदीयमान साक्षरता

(3) अधिभाषिक योग्यता

(4) स्वनिमिक जागरूकता

**138.** एक आई दुसऱ्या इयत्तेच्या शिक्षिकेला सांगते. 'तिचे मूल काहीवेळा असे काही बोलते जे तिने कधीही मुलाच्या भावंडांकडून किंवा मोठ्या माणसांकडून ही ऐकले नाही, हे कसे काय ?' आईच्या या प्रश्नासाठी नेमके उत्तर शोधा.

(1) मानवी मेंदू सहजगत्या भाषा आत्मसात करण्यास सक्षम असतो.

(2) त्यांच्या भाषाज्ञानाचे प्रबलीकरण केल्यावरच ते भाषा शिकतात.

(3) संरचनात्मक पद्धती प्रमाणे मुले जात्याच नवी भाषा तयार करतात.

(4) मूल नेहमी मोठ्यांच्या अनुकरणातून भाषा शिकतात.

**139.** सुरवातीच्या साक्षरतेच्या उपक्रमात. मूल आणि एक मोठी व्यक्ती सोबतच एक पुस्तक पाहतात आणि मोठी व्यक्ती प्रश्न विचारुन संभाषणाला उत्तेजन देते, नंतर त्यांची भूमिका बदलते नि मूल प्रश्न विचारते. हे कशाचे उदाहरण आहे ?

(1) सहवाचन

(2) संभाषणात्मक वाचन (Dialogic reading)

(3) कथा वाचन

(4) आदर्श वाचन (Model reading)

**140.** विद्यार्थ्यांमध्ये भाषेचे श्रवण कौशल्य विकसित करताना शिक्षकाने काय केले पाहिजे.

(1) इतर भाषिक कौशल्यांचा विचार न करता फक्त श्रवण कौशल्यावरच भर देणे.

(2) मुलांना वेगवेगळ्या माध्यमातून श्रवण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी; वेगवेगळ्या लोकांना ऐकण्याची संधी उपलब्ध करून द्यावी आणि त्यांना या उपक्रमात गुंतवून ठेवावे.

(3) मुलांना निष्क्रियतेने जे ऐकतील ते ऐकू द्यावे.

(4) विद्यार्थ्यांशी वर्गात नि वर्गाबाहेर बोलत राहावे.

**141.** *विधान (A) :*
प्राथमिक पातळीवर भाषेतील अचूकता अत्यंत महत्त्वाची असते.
*कारण (R) :*
प्राथमिक पातळीवरच्या अभ्यासक्रमात व्याकरण हे अंतर्भूत घटक असते.
योग्य पर्याय निवडा.

(1) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण ***नाही***.

(2) (A) बरोबर आहे, पण (R) चूक आहे.

(3) (A) चूक आहे, पण (R) बरोबर आहे.

(4) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

**142.** भाषेचे स्वरूप, भाषा शिक्षणाचे स्वरूप आणि या दोघांचे शिक्षण पद्धतीत उपयोजन म्हणजे....

(1) आशय

(2) धोरण

(3) तंत्र

(4) अभ्यासक्रम

**143.** रचनात्मक मूल्यमापन म्हणजे....

(1) घडत असलेला विकास आणि सुधारणा.

(2) अभ्यासक्रमात ठराविक टप्प्यावर पण विशिष्ट प्रकारे न ठरवता केलेले मूल्यमापन.

(3) परिवर्तनाशी संबंधित नसलेले.

(4) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत जे घडते ते.

**144.** मुलांसाठी नवीन धडा ठरवताना शिक्षिका 'समग्र शारीरिक प्रतिभाव' (TPR) पद्धतीवर भर देण्याचे ठरवते. 'समग्र शारीरिक प्रतिभावाचे' पाठात नीट उपयोजन होण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या गोष्टीचा समावेश करावा ?

(1) मुले त्यांच्या जागेवरच बसून राहतील आणि जोडीने किंवा गटात काम करतील असे उपक्रम करावे.

(2) वर्गात काही श्रवण उपक्रम करावेत.

(3) कोणताही उपक्रम न करता. मुलांना प्रश्न विचारुन उत्तरे देण्यास सांगावे.

(4) वर्गात काही शारीरिक हालचाली होतील असे घटक समाविष्ट करावे.

**145.** 'भाषा शिकणे म्हणजे भाषेचे नियम शिकणे' असे मानणारी कोणती व्याकरण पद्धती आहे ?

(1) उदगामी (Inductive)

(2) संज्ञापनात्मक (Communicative)

(3) व्याकरण भाषांतर (Grammar Translation)

(4) निगमनात्मक (Deductive)

**146.** पाचव्या इयत्तेतील मुलांना 'मुक्त लेखन' कार्य देण्याचे शिक्षिका ठरवते. पुढीलपैकी कोणत्या घटकावर शिक्षिकेने सर्वाधिक भर द्यावा ?

(1) मजकुरातील प्रवाहीपण.

(2) मजकुरातील अचूकता नि प्रवाहीपण दोघांवर भर द्यावा.

(3) मुलाचे अक्षर.

(4) मजकुरातील अचूकता.

**147.** 'टॉप-डाऊन' म्हणजे, 'समग्र अर्थाला समजणे'. तर 'बॉटम-अप' म्हणजे ?

(1) पूर्व-वाचनावर भर देणे.

(2) मजकुरातील शब्द आणि पदबंध यावर भर देणे.

(3) संक्षिप्त प्रश्नोत्तर विचारण्यावर भर देणे.

(4) मजकुराचा ढोबळ अर्थ लावणे आणि त्यातील कल्पना/विचार समजणे.

**148.** पुढीलपैकी भाषाशिक्षकाची प्राथमिक जवाबदारी कोणती ?

(1) अध्यापनसाठी योग्य सामग्रीची निवड करणे.

(2) विविध गटांत मुलांची वर्गवारी लावणे.

(3) मुलांना सूचना देणे.

(4) मुलांची संज्ञापनात्मक गरज जाणणे.

**149.** एक मूल पुस्तक हातात घेते आणि त्याची योग्य बाजू हातात घेऊन पानं उलटते. असे करणे म्हणजे....

(1) उदीयमान अभ्यासक्रम

(2) उदीयमान गुणधर्म

(3) उदीयमान उपाय कौशल्य

(4) उदीयमान साक्षरता कौशल्य

**150.** *विधान (A) :*

मुले भाषा आत्मसात करतात कारण ते अनुवांशिक आणि नैसर्गिकरित्या सक्षम असतात. सभोवतालचा यात काहीही सहभाग नसतो.

*कारण (R) :*

विद्यार्थीकेंद्री असलेल्या वर्गातील वातावरणाचा भाषा आत्मसात करण्यावर खूप प्रभाव असतो.

योग्य पर्याय निवडा.

(1) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण ***नाही***.

(2) (A) बरोबर आहे, पण (R) चूक आहे.

(3) (A) चूक आहे, पण (R) बरोबर आहे.

(4) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

# SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची ज्या पद्धतीने उत्तरे द्यायची आहेत त्याचे उत्तर टेस्ट बुकलेटमध्ये दिले आहे जे तुम्ही प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचले पाहिजे.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर फक्त एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेनने** संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी ध्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तर पत्रिकेमध्ये एक मशीन कोडेड माहिती वाचेल. म्हणून कोणतीही माहिती अपूर्ण ठेवली जाऊ नये आणि प्रवेश पत्रात दिलेल्या माहितीपेक्षा ती वेगळी असू नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त इतर कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, वायरलेस कम्युनिकेशन डिव्हाइस (अगदी स्विच ऑफ मोडमध्येही) आणि इतर बंदी घातलेल्या वस्तू परीक्षा सभागृह/खोल्यामधे आणू नयेत. या सूचनेचे पालन करण्यात अयशस्वी होणे ही परीक्षेत अयोग्य पद्धतीचा वापर असल्याचे समजले जाईल आणि परीक्षा रद्द करण्यासह उमेदवाराविरुद्ध कारवाई केली जाईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा केन्द्र अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह / खोली सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. **परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्या ची खूण उपस्थिति पृष्ठावर दिलेल्या जागेत अवश्य नमूद करावी.**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तसंचालित गणितयंत्राचा (calculator) उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील / खोलीमध्ये वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना परीक्षा मंडळ नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय परीक्षा मंडळ द्वारे नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue/Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left-hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room/Hall.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, काग़ज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी के विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अँगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा-हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष/हॉल छोड़ने से पूर्व उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें ।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।***